उल्हासनगर महानगरपालिका
मालमत्ता कर विभाग
मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर- ४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Tel No:- 95251-2720116 /125 Ext. No. 238 Fax No:- 95251-2720104

जा. क्र. उमपा/कर विभाग/उक्र-५/२४/२०२३
दिनांक१२ जुलै, २०२३

विषय---मालमत्ता क्रमांक ३४सीओ००६२३४७०० (बॅ नं. ९५७ जवळ उल्हासनगर-३) अन्वये श्री बसप्पा कागडा यांनी वालधुनी नदीच्या पात्रालगत शासनाच्या मोकळया भूखंडावर अतिक्रमाण केलेल्या जागेची मालमत्ता कर देयक तात्काळ रदद करणेबाबत

संदर्भ---श्री राजेंद्रसिंह वी. भुल्लर (महाराज), शिवसेना शहर प्रमुख- उल्हासनगर शहर, ममता अपार्टमेंट सी ब्लॉक रोड उल्हासनगर-१ यांचेकडील दिनांक १४/०६/२०२३ रोजीचा अर्ज (टोकन नं ४१२०२३०००१०७३४)

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ३४सीओ००६२३४७०० जुना क्रमांक ३४/०६९२ (बॅ नं. ९५७ जवळ उल्हासनगर-३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता प्रथम कर निर्धारणापासुन (वर्ष १९८६) कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन Leela Vishambaram या नावाची नोंद होती

तदनंतर सदर मिळकतीकरीता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन Bassappa Kaggda या नावाची नोंद दिसुन येते

श्री राजेंद्रसिंह वी. भुल्लर (महाराज), शिवसेना शहर प्रमुख- उल्हासनगर शहर यांनी दिनांक १४/०६/२०२३ रोजीचे अर्जान्वये प्रभाग समिती क्र ३ चे कार्यक्षेत्रात बॅ नं ९५७ बर्नर फॅक्टरीजवळ उल्हासनगर-३ या ठिकाणी वालधुनी नाल्यालगत मोकळा भुखंड असुन सदर भुखंड शासनाच्या मालकीचा आहे सदर जागेवर भूमाफियांनी विनापरवानगी व बेकायदेशिररित्या नदीपात्रालगत सपाटीकरण करुन अतिक्रमण केले आहे श्री बसप्पा कागडा यांनी सदर जागेवर बोगस कागदपत्राच्या आधारे मालमत्ता कर देयक बनविले आहे ते रदद करणेबाबत तक्रार केली आहे

श्री राजेंद्रसिंह वी. भुल्लर (महाराज) यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर जागेवर पत्रेविटा बांधकाम व मोकळी जागा दिसुन आली आहे तसेच मालमत्ता क्रमांक ३४सीओ००६२३४७०० (बॅ नं. ९५७ जवळ उल्हासनगर-३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतींकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती Bassappa Kaggda या नावाची नोंद करणेसंबंधी कोणतेही कायदेशिर कागदपत्रे कर विभागात उपलब्ध नाहीत तसेच सदर जागेमध्ये सदरची मिळकत शासनाचे मालकीची असल्याने यावर अतिक्रमण केल्यास कायदेशिर कारवाई करण्यात येईल, असा महाराष्ट्र शासनाचा फलक लावण्यात आलेला आहे. सोबत छायाचित्र जोडत आहे

महानगरपालिका प्रभाग समिती क्र ३ क्र उमपा/अबांनिवी/ ७५/२०२२ दिनांक ०३/०६/२०२२ तसेच अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील पत्र उमपा/प्र.स ३/१५४/२०२२ दिनांक १०/०६/२०२२ नुसार विषयांकित भुखंड हा शासनाच्या असल्याने सदर ठिकाणी होत असणारे अतिक्रमण हटविणेकामी आवश्यक कार्यवाही करणेबाबत व्यवस्थापकीय अधिकारी, उल्हासनगर शहर वसाहत तथा उपविभागीय अधिकारी पवई चौक उल्हासनगर-३ व तहसिलदार, उल्हासनगर यांना कळविले आहे.

तसेच बॅ नं. ९५७ समोर बॅनर फॅक्टरीजवळ, उल्हासनगर-३ या ठिकाणी अविनाश चंद्रअप्पा सुनकर व श्री बसप्पा कागडडा यांनी कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशिरपणे गाळयाचे बांधकाम केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महानगरपालिकेमार्फत श्री बसप्पा कागडडा व श्री अविनाश चंद्रअप्पा सुनकर यांचेविरुध्द मध्यवर्ती पोलीस ठाणे येथे एफआयआर क्रमांक ०४२३/२०२३ (दिनांक ७/७/२०२३, १३.३८ वाजता) नुसार महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे

Scanned with CamScanner

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधांच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मालमत्तांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येते. मालमत्ता कर वसुलीकरीता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोद आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात फक्त मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही.

त्याअनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ३४सीओ००६२३४७०० (बॅ नं. ९५७ जवळ उल्हासनगर-३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता प्रथम कर निर्धारणानुसार असलेल्या नोंदी पुर्ववत करुन सदर भुखंडाच्या मालकी हक्काबाबत व्यवस्थापकीय अधिकारी, उल्हासनगर शहर वसाहत तथा उपविभागीय अधिकारी पवई चौक उल्हासनगर-३ तसेच तहसिलदार, उल्हासनगर-५ या कार्यालयाकडे विचारणा करणेसाठी शिफारस करण्यात आली आहे

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) श्री राजेंद्रसिंह वी. भुल्लर (महाराज) यांनी दाखल केलेली हरकत व उपलब्ध कागदपत्राच्या आधारे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ३४सीओ००६२३४७०० (बॅ नं. ९५७ जवळ उल्हासनगर-३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता प्रथम कर निर्धारणानुसार असलेल्या नोंदी पुर्ववत कराव्यात.

२) त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करणेसाठी सदर भुखंडाच्या मालकी हक्काबाबत व्यवस्थापकीय अधिकारी, उल्हासनगर शहर वसाहत तथा उपविभागीय अधिकारी पवई चौक उल्हासनगर-३ तसेच तहसिलदार, उल्हासनगर-५ या कार्यालयाकडे विचारणा करावी

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

O/C

प्रत-
१) मे काल्म्रो ग्रुप
२) श्री राजेंद्रसिंह वी. भुल्लर (महाराज), शिवसेना शहर प्रमुख- उल्हासनगर शहर, ममता अपार्टमेंट सी ब्लॉक रोड उल्हासनगर-१

Scanned with CamScanner